पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी – ४११ ०१८.
मुख्य लेखा परिक्षक यांचे कार्यालय.
क्र.मुलेप/१/कावि/४५/२०१५
दिनांक :- ६/०४/२०१५

**विषय :- ठेकेदार नोंदणी नस्त्यांचे लेखा परिक्षणाबाबत...**

परिपत्रक,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने विविध विकासकामे ठेकेदारी पध्दतीने करण्यात येतात. तसेच विविध विभागांकडून साहित्य, मशिन्स, यंत्रसामुग्री, उपकरणे इ. ठेकेदारामार्फत खरेदी करण्यात येते. त्याचप्रमाणे विविध विभागांकडून आऊटसोर्सीगव्दारे ठेकेदारामार्फत कामे केली जातात. या सर्व ठेकेदारांची संबंधित विभागांकडून ठेकेदार नोंदणी करून संबंधित ठेकेदारास नोंदणी प्रमाणपत्र दिले जाते. सदर ठेकेदार नोंदणी नस्त्यांचे लेखा परिक्षण केले असता बहुतांशी ठेकेदारांनी विहीत कागदपत्रांची पुर्तता केली नसल्याचे आढळून आले आहे. सदर बाब गंभीर स्वरूपाची असल्याने यापुढे दि.१ एप्रिल २०१५ पासून ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्र देणेपूर्वी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून सदर नस्ती मुख्य लेखा परिक्षक यांचेकडे लेखा परिक्षणासाठी सादर करावी व मुख्य लेखा परिक्षक यांचे शेरांकनानुसार संबंधित ठेकेदारास ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्र देण्यात यावे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति,
संबंधित सर्व शाखाप्रमुख,
--------------------------------
--------------------------------